'लोकमाता गोदावरी' पुस्तकाचे उद्या प्रकाशन

कर्डिले, देऊळगावकर यांची उपस्थिती

नांदेड : चंद्रकला आणि एल. के. कुलकर्णी या शिक्षक दाम्पत्याने संयुक्तपणे लिहिलेल्या 'लोकमाता गोदावरी-समग्र दर्शन' या नव्या पुस्तकाचे प्रकाशन उद्या (रविवारी) येथील डॉ. शंकरराव चव्हाण नियोजन भवनाच्या सभागृहात सकाळी ११ वाजता होणार आहे.

हे पुस्तक पुण्याच्या राजहंस प्रकाशन संस्थेने गेल्या महिन्यात प्रकाशित केले. त्याचे प्रकाशन पर्यावरण तज्ज्ञ व लेखक अतुल देऊळगावकर यांच्या हस्ते व जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली केले जाणार आहे.

कुलकर्णी दाम्पत्याने सुमारे एक तपांपूर्वी गंगा नदीवरील 'गंगे तुझ्या तीराला' हा महत्त्वाचा ग्रंथ मराठी वाचकांसमोर आणला होता. भारतीय लोकजीवनाचा अविभाज्य भाग असलेली गंगा नदी, तिचा भौगोलिक विस्तार आणि तिच्या सांस्कृतिक प्रभावाचा समग्र मागोवा या ग्रंथामध्ये घेण्यात आला होता. त्यानंतर या दाम्पत्याने दक्षिण गंगा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गोदावरी नदीचा समग्र अभ्यास तसेच गोदातीराची भ्रमंती करून करून महाराष्ट्रातील एका महत्त्वाच्या नदीची थोरवी वाचकांसमोर आणली आहे.

वरील प्रकाशन समारंभास साहित्यिक, शिक्षक, पत्रकार व पुस्तकप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राजहंस प्रकाशन आणि अभंग पुस्तकालय या आयोजक संस्थांनी केले आहे.

नांदेडमध्ये दुष्काळी कामांना गती

रोजगार हमी योजनेच्या कामांवर १२ हजार ११३ मजूर

लोकसत्ता वार्ताहर

नांदेड : ग्रामीण भागातील गरजू कुटुंबांना हक्काचा रोजगार देणाऱ्या व्हीबीजी-रामजी (विकसित भारत-रोजगार आणि आजीविका मिशन ग्रामीण) योजनेअंतर्गत नांदेड जिल्ह्यात कामांनी मोठा वेग घेतला आहे. जिल्ह्यात सध्या एकूण ६ हजार ४७६ कामे सुरू असून त्यावर १२ हजार ११३ मजूर काम करत आहेत. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळत असून, मजुरांच्या हाताला काम मिळत आहे.

ही योजना पूर्वीच्या मनरेगा योजनेच्या जागी १ जुलै २०२६ पासून लागू करण्यात आली आहे. या योजनेत पूर्वीच्या १०० दिवसांऐवजी आता प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला वर्षाला १२५ दिवसांचा रोजगाराची कायदेशीर हमी देण्यात आली आहे. काम मागितल्यापासून १५ दिवसांत काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूदही या कायद्यात आहे. तसेच मजुरी वेळेवर न मिळाल्यास नुकसान भरपाई देण्याची व्यवस्था आहे.

नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यांमध्ये ही कामे सुरू आहेत. यामध्ये जलसंधारण, नाला खोलीकरण, शेततळे, पाझर तलाव दुरुस्ती, घरकुल, शौचालय, सिंचन विहीर आणि पाणलोट क्षेत्रातील कामांचा समावेश आहे. ही कामे ग्रामपंचायतींच्या माध्यमातून नियोजन करून केली जात आहेत.

जिल्हा प्रशासनाकडून मिळालेल्या माहितीनुसार, मजुरांची उपस्थिती, ई-केवायसी आणि मस्टर यांची नियमित तपासणी केली जात आहे. मजुरी थेट मजुरांच्या बँक खात्यात जमा केली जाते. त्यामुळे पारदर्शकता वाढली आहे. महिलांचा सहभागही या योजनेत लक्षणीय असून, अनेक ठिकाणी महिला मजूर मोठ्या संख्येने कामावर आहेत.

रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी नुकत्याच घेतलेल्या आढावा बैठकीत नांदेड जिल्ह्याच्या कामाचे समाधान व्यक्त केले होते. कामांची संख्या आणखी वाढवून एकही पात्र व्यक्ती रोजगारापासून वंचित राहणार नाही, याची काळजी घेण्याच्या सूचना त्यांनी दिल्या आहेत.

दुष्काळी परिस्थिती, शेतीवरील अवलंबित्व आणि स्थलांतर रोखण्यासाठी ही योजना नांदेडसाठी वरदान ठरत आहे. शेतीची कामे संपल्यानंतर गावातील मजुरांना गावातच रोजगार मिळत असल्याने स्थलांतराचे प्रमाण कमी झाले आहे. पुढील काळात जिल्ह्यात आणखी नवीन कामे मंजूर करून मजुरांची संख्या वाढवण्याचे नियोजन प्रशासनाने केले आहे. ज्या मजुरांकडे अजून जॉब कार्ड नाही, त्यांनी आपल्या ग्रामपंचायतीत अर्ज करून कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.



कामावर असलेले मजूर

अर्धापूर-२१५, भोकर-३८५, बिलोली-८२५, देगलूर-५१०, धर्माबाद-७६, हदगाव-१७३५, हि.नगर-५९९, कंधार-२५००, किनवट-११८५, लोहा-९२६, माहूर-८१, मुदखेड-६६२, मुखेड-६२०, नायगाव-९२२, नांदेड-३३७, उमरी-५३५ असे ९२११३ मजूर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कामावर आहेत.

दोन तरुण मजुरांचा मृत्यू

हाताला काम मिळवण्यासाठी तेलंगणातील आदिलाबाद येथे कापूस वेचण्यासाठी निघालेले दोन मजूर धावत्या डेमो रेल्वेतून खाली पडून जागीच ठार झाल्याची घटना गुरुवार (दि.१२) दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास मदनापूर रेल्वे स्टेशनजवळ घडली. हदगाव तालुक्यातील नावा येथील विश्वंभर शंकर देशमुखे (वय ३५) व बंडू धोंडिबा देशमुखे (वय ३५) हे दोघे दिवाळी संपल्यानंतर आदिलाबादकडे जात होते. गाडीत प्रचंड गर्दी असल्याने ते दोघे रेल्वेच्या दरवाजात उभे होते. खचाखच गर्दीमुळे पाय ठेवायलाही जागा नसल्याने ते धावत्या गाडीतून खाली पडले. त्यांना तातडीने किनवट रेल्वे स्थानकावर आणून दुपारी १:२० वाजता गोकुंदा येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र त्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

वसमतच्या रिधोरा गावात 'विचारांची भाऊबीज'!



लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : हिंगोलीच्या वसमत तालुक्यातील रिधोरा येथे अधिकारी आणि कर्मचारी मंचाच्या पुढाकारातून आयोजित 'विचारांची भाऊबीज' या ग्रामविकास जागर कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी करण्यात आले होते. कविवर्य इंद्रजीत भालेराव प्रतिष्ठान आणि ग्रामस्थांच्या वतीने आयोजित या अकराव्या वर्षातील कार्यक्रमामध्ये गुणवंत विद्यार्थी आणि कर्तृत्ववान ग्रामस्थांचा सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ रणधीर तेलगोटे होते. यावेळी मंत्रालयातील विशेष कार्य अधिकारी नानासाहेब कदम, कृषिकवी तथा 'झेंडूची फुले' अभियानाचे अण्णासाहेब जगताप, कविवर्य इंद्रजित भालेराव यांची प्रमुख उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोपात तेलगोटे यांनी 'एक गाव, एक स्मशानभूमी' चळवळ गतिमान करण्याची गरज व्यक्त केली. यावेळी कदम यांच्या वतीने ग्रामस्थांना महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे समग्र साहित्यखंड भेट देण्यात आले.

प्रख्यात गायक पंजाबराव अंभोरे यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या 'अरे संसार संसार', 'हिरीताचं देणं-घेणं' आणि 'काय घडे आवगत' या कवितांचे गायन करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

मोहनराज बाबा शेवलीकर यांनी प्रास्ताविक केले. अरुण चव्हाळ यांनी सूत्रसंचालन केले. नवनाथ बाबाराव भालेराव यांच्या वतीने सामूहिक पंगतीचे आयोजन करण्यात आले होते. नवयुवक मित्रमंडळाने कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पुढाकार घेतला.

छत्रपती संभाजीनगरमध्ये टँकरच्या पाण्यासाठी नगरसेवक आक्रमक

लोकसत्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : पाणीपुरवठा योजनेंतर्गत शहरात १८० ते २०० नागरी वसाहतींना पाणी देण्यासाठी टँकर मुदतवाढीचा प्रस्ताव आणि अंदाजपत्रकानुसार नवीन निविदा प्रक्रिया राबविण्याचा प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्यात आला. शहरातील अनेक भगाात आता पाण्यासाठी टँकरवर अवलंबून रहावे लागते आहे.

महापालिकेची सर्वसाधारण सभा महापौर समीर राजूरकर यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवारी सभा घेण्यात आली. या सभेस उपमहापौर, आयुक्त अमोल येडगे, नगरसचिव नंदकिशोर भोंबे यांची व्यासपीठावर उपस्थित होती.

शहरातील नो-नेटवर्क भागात पाणी पुरवठा करण्यासाठी टँकरला मुदतवाढ देत नवीन वर्षासाठी अंदाजपत्रक तयार करून नवीन निविदा प्रक्रिया राबविण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला होता. या प्रस्तावावर चर्चा करताना शिवसेनेचे गटनेते गणेश लोंखडे म्हणाले की, शहरासाठी २७४० कोटी रुपये खर्चून नवीन पाणी पुरवठा राबविण्यात येत आहे. या योजनेतून शहराला पाणी पुरवठा सुरू करण्यात आला. तेव्हा फुगडी खेळत पेढे वाटून आंनदोत्सव साजरा केला. परंतु, शहरातील २०० वसाहतींना अद्यापही नळाद्वारे पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. सातारा-देवळाई, पडेगाव-मिटमिटा, मिसारवाडी, हर्सूल, नारेगाव यासह नो-नेटवर्क भागात जलकुंभ उभारण्यात येऊन नवीन जलवाहिनी टाकण्यात आली आहे. मात्र, नवीन योजनेतून पाणी पुरवठा सुरू झालेला नाही. या भागाला कधी पाणी देणार हे अगोदर सांगा, असा प्रश्न नगरसेवकांनी केला. पडेगाव-मिटमिटा भागात रस्त्याचे काम सुरू झाल्यामुळे जलवाहिनी काढून ठेवण्यात आलेली आहे. त्यामुळे या भागाचा पाणीपुरवठा कधी सुरू करणार हे सभागृहाला अवगत करावे असा प्रश्न विचारण्यात आला.

महापालिका आयुक्त अमोल येडगे म्हणाले की, नळ पाणी पुरवठा योजना नसलेल्या भागाला पाणी पुरवठा सुरू करण्यास प्राधान्य देण्यात आले आहे. १४ झोनमधील जलकुंभ आणि जलवाहिन्यातील गॅप जोडण्याचे काम सुरू करण्यात आले आहे. टप्याटप्याने या भागात लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरू केला जाईल. टँकरवरील खर्चाला मान्यता देऊन नवीन वर्षासाठी सादर केलेल्या चार कोटीचा टँकरवरील खर्च आणि ५ कोटी १ लाख ३९ हजार रुपयांचा अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली.

'बाली'मध्ये आंबेडकरवादी साहित्य संमेलन

छत्रपती संभाजीनगर : इंडोनेशिया येथील बाली येथे १९ व २० नोव्हेंबर रोजी सातवे आंबेडकरवादी विश्व साहित्य संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी येथील मिलिंद कला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. वैशाली प्रधान यांची निवड करण्यात आली आहे.

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाच्या वतीने आयोजित या संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी प्राचार्या वैशाली प्रधान यांची निवड ही त्यांचे सामाजिक, सांस्कृतिक, वाङमयीन व शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी पाहून करण्यात आल्याचे महामंडळाचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे व सरचिटणीस डॉ. अनिल काळबांडे यांनी पत्राद्वारे कळवल्याची माहिती मिलिंद महाविद्यालयाकडून दिली.

संजय शिरसाट यांची विधाने महायुतीत मिठाचा खडा - मुश्रीफ

कोल्हापूर : संजय शिरसाट असोत की त्यांचे रायगडमधील नेते. हे लोक राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि पक्षाच्या नेत्यांबद्दल फार वाईट भाषेत टीका करीत आहेत. भयानक बिनबुडाची वक्तव्ये करून महायुतीमध्ये मिठाचा खडा टाकण्याचा प्रकार करीत आहेत, अशी टीका वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी येथे गुरुवारी पत्रकारांशी बोलताना केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना अत्यंत कडक शब्दांत सूचना दिली पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली सर्व आमदार एकसंध आहोत. आमदारांचा दुसरा गट होण्याची तर शक्यताच नाही, सुनेत्रा पवार यांच्या निर्णयाशी आम्ही ठामपणे उभे राहू.

ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या प्रकृतीबाबत विचारले असता मुश्रीफ म्हणाले, मुंबईला गेल्यानंतर त्यांच्या प्रकृतीची विचारपूस करणार आहे.

नोंदणीकृत कार्यालय: ६०१ आणि ६०२, पेनिन्सुला बिझनेस पार्क, ६वा मजला, टॉवर ए, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई - ४०००१३.

DCB BANK

जाहीर सूचना

दागिन्यांच्या लिलावासह निमंत्रण सूचना

खाली नमूद केलेल्या कर्जदारांना डीसीबी बँक लिमिटेड यांच्याकडून डीसीबी बँक लिमिटेडकडे तारण ठेवलेल्या दागिन्यांसाठी मिळालेल्या सुविधांमध्ये संपूर्ण थकबाकी भरण्यासाठी नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. संपूर्ण थकबाकी भरण्यात अयशस्वी झाल्यामुळे आम्हाला तारण ठेवलेल्या दागिन्यांचा पहिला लिलाव करण्यास भाग पाडले जात आहे. पहिला लिलाव **दि. १४.१२.२०२६ आणि दि. १५.१२.२०२६ रोजी दुपारी १२.०० वा. ते सायं. ४.०० वा. पर्यंत** रकान्यामध्ये नमूद केलेल्या खाली नमूद केलेल्या शाखा/ ठिकाणी शाखांमध्ये आयोजित केला जाईल. संभाव्य बोलीदारांना लिलावाच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसह अधिक तपशीलांसाठी संबंधित बँक शाखेशी संपर्क साधण्याचा सल्ला देण्यात येत आहे. कर्जदार आणि बोलीदार लिलावाच्या शाखा पत्ते/ठिकाणासाठी आमची वेबसाइट **www.dcb.bank.in** चा संदर्भ घेऊ शकतात.

अ. क्र.	ग्राहक आयडी	ग्राहकाचे नाव	शाखा / ठिकाण
१	१०९७४८९७६	नवले अविनाश अंबादास	बीड - बीड
२	१०२७८२२५९	रमेश रामनाथ मोहरे	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
३	१०५८७७९०८	शेख नसीर अहमद	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
४	१०५९७४९९८	इरफान मेहमूद सय्यद	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
५	१०६५०६०३१	शेख नदीम शेख राह	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
६	१०७६५४३४६	मिर्झा सोफियान बेग मिर्झा	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
७	१०८९९८६०२	अब्दुल ए रज्जाक	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
८	१०९३१८०१६	शिरिन बेगम मोहम्मद इल	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
९	१०९४९२७६८	शेख झेड अथर पाशा	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
१०	१०९६४९१७४	जाबेर के पठाण	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
११	१०९६५८७८७	तौसीफ बी पठाण	छत्रपती संभाजीनगर - औरंगाबाद
१२	१०६३७१५२२	अमोल एस माळी	धाराशिव - धाराशिव
१३	१०९१४८९०७	शेख मोईझ शेख अलीम	रौझा बाग - औरंगाबाद

सदर या प्रकाशनाद्वारे, संबंधित कर्जदार/तारणधारक/कायदेशीर वारस/प्रतिनिधी/उत्तराधिकारी/नामांकित व्यक्तींना अंतिम सूचना देण्यात येत आहे आणि परत मागवलेली सुविधा परत मागितलेली रक्कम नियोजित लिलावाच्या तारखेला किंवा त्यापूर्वी पूर्णपणे भरण्याची शेवटची संधी देण्यात येत आहे, अन्यथा दागिन्यांचा लिलाव केला जाईल. बँकेला नियोजित लिलावाच्या तारखांना लिलाव न झालेल्या वस्तू पुढील कोणत्याही दिवशी ई-लिलाव, खाजगी विक्री इत्यादींसह विक्रीच्या इतर पद्धतींद्वारे पूर्वसूचना न देता विकण्याचा अधिकार आहे / आणि पुढील सूचना न देता लिलावाचे ठिकाण/विक्रीचे ठिकाण बदलण्याचा अधिकार आहे. लिलावात सहभागी होणे आणि बोली स्वीकारणे हे डीसीबी बँकेच्या विवेकबुद्धीनुसार असेल. डीसीबी बँक लिमिटेडला कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय खाते काढून टाकण्याचा/लिलावाची तारीख बदलण्याचा अधिकार आहे. हे पुन्हा एकदा सांगितले जाते की, कर्जदारांना ही अंतिम सार्वजनिक सूचना आहे आणि वरील नंतरच्या दागिन्यांच्या लिलावासाठी कोणतीही सूचना दिली जाणार नाही.

कृपया लक्षात ठेवा की, लिलाव "जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे", "तिथे जे काही आहे याआधारावर" आणि "कोणत्याही आधाराशिवाय" या तत्त्वावर असेल आणि दागिन्यांशी किंवा त्याच्या लिलावाशी संबंधित कोणतेही दावे, वाद, आक्षेपांसाठी डीसीबी बँक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

सही/-
अधिकृत अधिकारी,
डीसीबी बँक लिमिटेड

दिनांक: १४.११.२०२६

लोकसत्ता Classifieds
FROM ANYTHING TO EVERYTHING.

यात्रासहल

*श्रीरामकृष्ण *:- *नर्मदापरिक्रमा- ०४/०१/२७ //०१.०२.२७//*अंदमान- २२.०२.२७// *नेपाळ- मुक्तीनाथसह// केरळ- तामिळनाडूसह// राजस्थान// कर्नाटक- कुर्गसह// हम्पी बदामी बिजापूरसह// *काश्मिर- टूलिपसह// त्रिस्थळी- नेमिषारण्यसह// कुरवपुर पिठापूर- // स्टॅच्यू ऑफ युनिटी द्वारकासह// उत्तरवाहिनी नर्मदापरिक्रमा- ०९.०४.२७// १६.०४.२७// संपूर्ण कोकण रत्नागिरी दर्शन प्रत्येक गुरूवारी बापट- 9137001395/ 9820023106/ 9820071471

0071041959-7

वधू-वर मेळावा

मराठा समाज वधूवर मेळावा रविवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२६. सकाळी ठीक १० वाजता. मराठा मंडळ सांस्कृतिक केंद्र, हरीनिवास सर्कल जवळ, पाच पाखाडी, ठाणे पश्चिम. नोंदणी ११ ऑक्टोबर २०२६ पासून रोज सकाळी ११ ते सायंकाळी ७.

0071064812-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रामध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील वाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातींतील आशयासाठी दे इंडियन एक्सप्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही स्वरूपाचे संपत्तिपत्र कार्यान्वित करण्यापूर्वी अथवा सदृश्या जाहिरातींवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

मालमत्तासंबंधी

4700 sq mtr land with rcc bungalow 2800 sq ft for sale near Sawantwadi city. price 5 Cr. contact 7796835863

0050301512-1

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा

HDB FINANCIAL SERVICES

एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : राधिका, २ रा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद ३८०००९.
प्रादेशिक कार्यालय : १ मजला, बिल्सन हाऊस, जुना नगरदास रोड, अंधेरी (पू.), मुंबई - ४०००६९.
शाखा कार्यालय : १ ला आणि २ रा मजला, चाबाडा सेंटर, विद्या नगर, सेव्हन हिल, जालना रोड, औरंगाबाद - ४३१००१.

स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी ई-लिलावाकरिता जाहीर सूचना

ईएमडी आणि कागदपत्रे सादर करण्याची शेवटची तारीख १५/१२/२०२६ रोजी सायं. ०५.०० वाजेपर्यंत

सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) अॅक्ट, २००२ (क्र ५४,२००२) अंतर्गत एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडड यांच्याकडे गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री. ज्या अर्थी, **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड** यांच्या अधिकृत अधिकाऱ्याने आमच्या शाखेतील खालील कर्ज खात्यांमधील खालील मालमत्तांचा सिक्युरिटायजेशन अँण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल अॅसेट्स अँण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) अॅक्ट, २००२ च्या कलम १३(२) अंतर्गत ताबा घेतला आहे. एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड यांच्या वसुलीसाठी "जसे आहे, तिथे आहे", "जसे आहे, जे आहे" आणि "तिथे जे काही आहे" या आधारावर विक्री करण्याचा अधिकार आहे. सदर विक्री ही वेबसाईट https://bankeauctions.com यावर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निम्नस्वाक्षरीकार यांच्याद्वारे केली जाईल.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

लॉट क्र.	शाखेचे नाव, कर्ज खाते क्रमांक आणि ग्राहकाचे नाव	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचे वर्णन, जी लिलाव विक्री आणि ताबा स्थिती अंतर्गत आहे	मागणी सूचना तारीख थकबाकी रक्कम (सुरक्षित कर्ज)	अधिकृत अधिकाऱ्याचे तपशील	ईएमडी सादर करण्यासाठी खाते तपशील	आरक्षित किंमत ईएमडी रक्कम बोलीची वाढ रक्कम	ई-लिलावाची तारीख / आणि ईएमडी सादर करण्याची शेवटची तारीख
१.	**एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड,** २ रा मजला, ॲक्सिस बँकेच्यावर, औसा रोड, लातूर - ४१३५१२ कर्ज खाते क्र. १०६१८३५३, १५५०८१४३ **१. भारत किराणा ॲण्ड जनरल स्टोअर्स** भारत किराणा ॲण्ड जनरल स्टोअर्स, सिद्धी निवास, जुना औसा रोड, लक्ष्मी कॉलनी, लातूर, लातूर - ४१३५१२ महाराष्ट्र **२. राहुल भारत बंडगर** भारत किराणा ॲण्ड जनरल स्टोअर्स, सिद्धी निवास, औसा रोड लातूर लक्ष्मी कॉलनी लातूर, लातूर महाराष्ट्र - ४१३५१२ **३. प्रिया राहुल बंडगर** जुना औसा रोड आर-१४२९/३, लक्ष्मी कॉलनी, सिद्धी निवास महाराष्ट्र ग्रामीण बँकेजवळ लातूर महाराष्ट्र - ४१३५१२ **४. राहुल भारत बंडगर** जुना औसा रोड आर - १४२९/३ सिद्धी निवास, लक्ष्मी कॉलनी, महाराष्ट्र ग्रामीण बँकेजवळ, लातूर, लातूर, महाराष्ट्र - ४१३५१२	सिक्युरिटीजचे परिशिष्ट - १ मालमत्ता प्लॉट क्र. २६ यापैकी आणि त्यावर बांधकाम केलेले, पश्चिम भाग आणि अ.क्र. ७३ यापैकी आणि सीटीएस क्र. ४०४७ एम.एच. क्र. आर-१-१४२९-३, नवीन ए१-४००, गुंठेवारी प्रमाणपत्र परवानगी क्र.एलएमसी/टीपी/८/१३३/२०१८-२०१९ दिनांकित १६/०८/२०१८ मोजमापे : दक्षिण - उत्तर - ४० फूट आणि पूर्व - पश्चिम - १७ फूट एकूण मोजमापे ६८० चौ. फूट (६३.१९ चौ.मी) लातूर नगर परिषदेच्या हद्दीत स्थित येथे लक्ष्मी कॉलनी, खडगाव, जुना औसा रस्ता, लातूर - ४१३५१२ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि द्वारे **सीमाबद्ध** - उत्तर -२० फूट रुंद रस्ता, दक्षिण - चौधरी यांची मालमत्ता, पूर्व - महादेव बंडगर यांचे घर, पश्चिम - उमाशंकर बंडगर यांचे घर.	दि. २७.०५.२०२६ रु. १५,१९,७०२.१७/- (रुपये पंधरा लाख एकोणीस हजार सातशे दोन आणि सतरा पैसे फक्त) दि. २७.०५.२०२६ रोजीनुसार	श्री. अजय गालफाडे, मोबाईल क्रमांक : ८७८८५५१६५५ ईमेल आयडी : lo.latur@hdbfs.com	खाते क्र. ००२१०३१०००२७४८ खाते नाव एचडीबीएफएस जनरल रिसीट्स आयएफएससी कोड-एचडीएफसी ०००००२१ बँक - एचडीएफसी बँक लिमिटेड शाखा-हैदराबाद - लकडी का पूल एमआयसीआर कोड - ५००२४०००२	आरक्षित किंमत रु.४२,३७,५९६/- (रुपये बेचाळीस लाख सदतीस हजार पाचशे शहाण्णव फक्त) ईएमडी रु. ४,२३,७६०/- (रुपये चार लाख तेवीस हजार सातशे साठ फक्त) रु.१५,०००.००	ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख १५-१२-२०२६ लिलावाची तारीख व वेळ : दि. १६-१२-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते सायं.५.०० वा. पर्यंत
२	**एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड,** २ रा मजला, ॲक्सिस, बँकेच्यावर, औसा रोड, लातूर - ४१३५१२ **कर्ज खाते क्र. ३७७३५५४४** **१. पटेल फूट वेअर,** सरदार पटेल रोड, परभणी - ४३१४०१ आणि तसेच वॉर्ड नं.६ सरदार पटेल रोड, न्यू कडबीमंडी, घर नं. २८४/१ सीटीएस नं. १८२, एम कार्ड नं. १८७३/३ भाग यापैकी, परभणी - ४३१४०१ **२. सय्यदमुख्तार सय्यद इमाम पटेल, सय्यद इमाम पटेल यांचा मुलगा रोशन खान** मोहल्ला कादराबाद प्लॉट, परभणी - ४३१४०१ **३. नुरजहाँ मुख्तार पटेल** कादराबाद प्लॉट अबोटी कोचिंग क्लासजवळ, परभणी - ४३१४०१	धारण मालमत्ता घर क्र. २८४/१, सीटीएस क्र. १८२, एम. कार्ड क्र. १८७३/३ भागापैकी, जो पूर्व/पश्चिम ७.७८ मी., दक्षिण-उत्तर ४.२७ मी. आहे. त्यावर एकूण ३३.२२ चौ. मीटर बांधकाम केलेले आहे, वॉर्ड क्र. ६, सरदार पटेल रोड, न्यू कडबीमंडी, एम. सी. हद्दीतील, परभणी, तालुका व जि. परभणी - ४३१४०१ यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि द्वारे **सीमाबद्ध** :- उत्तर - जियाउद्दीन पीरभाई लालानी यांचे घर, दक्षिण - हशमभाई लालानी यांचे घर, पूर्व - अमिना ताजोद्दीन लालाजी यांचे घर, पश्चिम सरदार पटेल रोड.	दि.१८/०५/२०२६ रु. ४६,३९,७७९.२/- (रुपये शेहेचाळीस लाख एकोणचाळीस हजार सातशे एकोणऐंशी आणि वीस पैसे फक्त) दि. १३.०५.२०२६ रोजीनुसार	श्री. अजय गालफाडे, मोबाईल क्रमांक : ८७८८५५१६५५ ईमेल आयडी : lo.latur@hdbfs.com	खाते क्र. ००२१०३१०००२७४८ खाते नाव एचडीबीएफएस जनरल रिसीट्स आयएफएससी कोड - एचडीएफसी ०००००२१ बँक - एचडीएफसी बँक लिमिटेड शाखा - हैदराबाद - लकडी का पूल एमआरसीआर कोड - ५००२४०००२	आरक्षित किंमत रु. ८५,७८,५६० (रुपये पंचाऐंशी लाख अठ्ठ्याहत्तर हजार पाचशे साठ फक्त) ईएमडी रु. ८,५७,८५६/- (रुपये आठ लाख सत्तावन्न हजार आठशे छपन्न फक्त) रु. १५,०००.००	ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख १५-१२-२०२६ लिलावाची तारीख व वेळ : दि. १६-१२-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते सायं. ५.०० वा. पर्यंत
३	**कर्ज खाते क्र. ५७४०८०४४** **१. सोहेल प्लॅस्टिक्स ॲण्ड स्टील** गहाणार : नूतन मैदान दर्गा रोडजवळ, परभणी - ४३१४०१. आणि तसेच धारण सर्वेक्षण क्र. २६१ प्लॉट क्र. १६३ ची उत्तर बाजू, परभणी ता. आणि जि. परभणी - ४३१४०१. **२. फरझानाबी सादेख शेख** आर/ओ, धार रोड, अमीन कॉलनी परभणी - ४३१४०१ **३. सोहेल सादेख शेख** आर/ओ. धार रोड, अमीन कॉलनी, परभणी - ४३१४०१ **४. सादेख खादर शेख** आर/ओ. धार रोड, अमीन कॉलनी, परभणी - ४३१४०१	प्लॉट क्र. १६३ च्या उत्तरेकडील अर्धा भाग, पूर्व-पश्चिम १५ मी., दक्षिण-उत्तर ०६ मी. एकूण मोजमापे क्षेत्रफळ ९० चौ. मी. सर्वेक्षण क्र. २६१ परभणी, ता. व जि. परभणी - ४३१४०१, महाराष्ट्र या अधिकारक्षेत्रात स्थित, यासोबत सदर फर्स्टट्रसच्या संदर्भातील सर्व मूलभूत हक्क आणि इतर हक्क व हितसंबंध यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल आणि द्वारे **सीमाबद्ध** :- उत्तर - प्लॉट क्र. १६२, दक्षिण - प्लॉट क्र.१६३ चा भाग, पूर्व - रस्ता आणि मोकळी जागा, पश्चिम - प्लॉट क्र.१८०, १८१ चा भाग.	दि.२०.०७.२०२६ रु. ४१,७४,६८०.५/- (रुपये एक्केचाळीस लाख चौऱ्याहत्तर हजार सहाशे ऐंशी आणि पन्नास पैसे फक्त) दि १४.७७.२०२६ रोजीनुसार	श्री. अजय गालफाडे, मोबाईल क्रमांक : ८७८८५५१६५५ ईमेल आयडी : lo.latur@hdbfs.com	खाते क्र. ००२१०३१०००२७४८ खाते नाव एचडीबीएफएस जनरल रिसीट्स आयएफएससी कोड - एचडीएफसी ०००००२१ बँक - एचडीएफसी बँक लिमिटेड शाखा - हैदराबाद - लकडी का पूल एमआयसीआर कोड - ५००२४०००२	आरक्षित किंमत रु. ३६,७८,४०० (रुपये छत्तीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार चारशे फक्त) ईएमडी रु. ३,६७,८४०/- (रुपये तीन लाख सदुसष्ट हजार आठशे चाळीस फक्त) रु. १५,०००.००	ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख १५-१२-२०२६ लिलावाची तारीख व वेळ : दि. १६-१२-२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. ते सायं. ५.०००